राष्ट्रोध्दाराय तंत्र शिक्षणम्

महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ - ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६५६२३४
E-mail : ropune@dtemaharashtra.gov.in
Web : www.ropune.org.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-३(अ)/जे.सू.रा/२०२३/ 1542 दिनांक 10 APR 2023

प्रति,

मा.कुलगुरू,महाराष्ट्र सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, पुणे
उपसचिव,महाराष्ट्र राज्य, तंत्रशिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय,
पुणे विभाग पुणे.
प्राचार्य ,शासकीय अभियांत्रिकी /शासकीय तंत्र निकेतन व तत्संम संस्था.

**विषय :- तंत्र शिक्षण संचालनालय व अधिनस्त सर्व संस्था/कार्यालयातील अधिक्षक,ग्रंथपाल व प्रोग्रामर या राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचाऱ्यांची दिनांक दिनांक ०१.०१.२०२२ ते ३१.१२.२०२२ मधील दिनांक ०१.०१.२०२३ रोजीची तात्पुरती जेष्ठतासूची**

संदर्भ :- तंत्र शिक्षण संचालनालयातील कार्यासन क्र. १२ दि.३०/०३/२०२३ रोजीचा ईमेल.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय परीपत्रकान्वये तंत्रशिक्षण संचालनालयाने तंत्र शिक्षण संचालनालय व अधिनस्त सर्व संस्था/कार्यालयातील अधिक्षक, ग्रंथपाल व प्रोग्रामर या पदावरील कर्मचाऱ्यांची दिनांक ०१.०१.२०२२ ते ३१.१२.२०२२, दिनांक ०१.०१.२०२३ रोजीची राज्यस्तरीय तात्पुरती ज्येष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

तरी या विभागातील सर्व संस्थाप्रमुख व कार्यालय प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक व जेष्ठतासूची तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर download section या सदराखाली उपलब्ध करण्यात आलेली आहे. तेथून उपलब्ध करून घेण्यात यावी. सदर जेष्ठतासूची आपल्या संस्थेतील/कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना देण्यात यावी जेष्ठतासूची प्रत देताना जेष्ठतासूची बाबत कोणताही आक्षेप नसल्याची नोंद तात्काळ एका नमुन्यामध्ये घेवून त्या रकान्यासमोर संबंधित कर्मचाऱ्याची स्वाक्षरी घेण्यात यावी. ज्या कर्मचाऱ्यांचा जेष्ठतासूची बाबत आक्षेप असेल तो नोंदवून घेण्यात यावा व त्याबाबत स्वतंत्र निवेदन घेण्यात यावे.

तसेच जेष्ठतासूचीतील त्रूटी अथवा वास्तविक चुका किंवा एखाद्या कर्मचाऱ्यांचे नाव जेष्ठतासूचीत टाकावयाचे राहिले असल्यास त्याबाबत संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांच्या संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमुखामार्फत आक्षेपाबाबतचे निवेदन सादर करावे. तसेच जेष्ठतासूची मधील सर्व माहिती बरोबर असल्याबाबत खात्री संस्थाप्रमुख/कार्यालय प्रमुख यांनी करावी. संबंधित कर्मचारी यांनी आक्षेपाचे निवेदन सादर केल्यास त्याची पडताळणी संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकावरुन करुन आपल्या अभिप्रायासह दिनांक १५/०४/२०२३ पूर्वी प्रमाणित करुन विभागीय कार्यालयास सादर करावे. तसेच काही आक्षेप नसल्यास तसे सुध्दा कळविण्यात यावे.

(डॉ. द.व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत -१) मा.संचालक तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) या कार्यालयातील संबंधित कर्मचाऱ्यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.